लोकमत पू. पान क्र. १

# आरोपीला १३ वर्षांनी बेड्या

## तीन गुन्ह्यांत होता फरार : मध्यवर्ती गुन्हे शाखेच्या पोलिसांना यश

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : खून, गँगरेप व जबर मारहाण या वेगवेगळ्या तीन गंभीर गुन्ह्यांत फरार असलेल्या आरोपीला १३ वर्षांनंतर अटक करण्यात मध्यवर्ती गुन्हे शाखेच्या पोलिसांना यश मिळाले आहे. या आरोपीकडून तीन गुन्ह्यांची उकल करून पुढील चौकशीसाठी वालीव पोलिसांच्या ताब्यात दिल्याची माहिती जनसंपर्क अधिकारी प्रवीण बनगोसावी यांनी शुक्रवारी दिली आहे.



तीन गंभीर गुन्ह्यांत फरार असलेल्या आरोपीला पकडण्यात मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी यश मिळवले आहे.

२२ नोव्हेंबर २०१२ रोजी धानिव बागच्या गांगडीपाडा येथे आरोपींनी चोर समजून एकाला मारहाण करून ठार मारले. त्याची ओळख पटू नये, यासाठी नग्न अवस्थेत टाकून दिले होते. वालीव पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला होता. या गुन्ह्यातील आरोपी अक्रम खान उर्फ शेख याचा शोध घेऊनही १३ वर्षांपासून सापडत नव्हता.

दुसऱ्या घटनेत १० सप्टेंबर २०१५ रोजी २० वर्षांच्या तरुणीवर रिक्षाचालक व त्याच्या इतर साथीदारांनी जबरदस्तीने नालासोपारा येथे नेऊन सामूहिक बलात्कार केला होता. तर तिसऱ्या घटनेत ४ ऑगस्ट २०१२ रोजी धानिवबाग येथे एकाने स्वतःच्या घरात आरोपीला न विचारता भाडेकरू ठेवल्याच्या कारणावरून आरोपी व इतर साथीदारांनी जबर मारहाण करून गंभीर दुखापत केली होती.

वरिष्ठ अधिकाऱ्यांनी चौकशीचे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेतील सपोनि दत्तात्रय सरक, पोलिस हवालदार शिवाजी पाटील, गोविंद केंद्रे, अकील सुतार यांनी गुन्ह्याची वालीव पोलिस ठाण्यातून माहिती घेतली. सखोल तपास करून सापळा लावून आरोपी अक्रम खान उर्फ शेख (३८) याला गुरुवारी ताब्यात घेतले.

# गांजासह आरोपी जेरबंद



नालासोपारा : शहराच्या पश्चिमेकडील समर्थनगर येथील सहारा बिल्डिंगच्या आतील बाजूला आडोशाला एका आरोपीला नालासोपाऱ्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी पकडले. आरोपी भूपेंद्र मकवाना (३७) याची झडती घेतली असता पोलिसांना ४५ हजार रुपये किमतीचा १ किलो ५७२ ग्रॅम वजनाचा गांजा मिळून आला. पोलिसांनी त्याच्याकडून प्लास्टिक पिशव्या, रोख रक्कम, मोबाइल असा एकूण ५६ हजार २३० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. पोलिसांनी एनडीपीएस ॲक्टनुसार गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केले आहे.

# विजेचा शॉक लागून मृत्यू



नालासोपारा : कोळीवाडा चर्चच्या बाजूला राहणारे सादिकअली सय्यद (४१) यांचा विजेचा शॉक लागून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. वसई किल्लाबंदर येथील राजेश दात्या (५३) हे गुरुवारी दुपारी घराला रंग देण्याचे काम करत होते. लाकडी बांबूने तयार केलेल्या परांचीवर काम करत असताना विद्युत वायरला स्पर्श झाल्याने ते भाजले गेले आणि खाली पडल्याने त्यांच्या डोक्याला मार लागून रक्तस्राव झाला. त्यांना उपचारासाठी सर डी. एम. पेटिट मनपा रुग्णालयात नेल्यावर तेथील डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. वसई पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

लोकमत पु. पान क्र. 1

# आयुक्तालयातील नऊ पोलिसांना सन्मानचिन्ह

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या मिरा भाईंदर वसई, विरार पोलिस आयुक्तालयातील दोन पोलिस निरीक्षक, एक सहायक पोलिस निरीक्षक, तीन सहायक पोलिस उपनिरीक्षक आणि तीन कर्मचाऱ्यांना २०२३ या वर्षाकरिता पोलिस महासंचालक सन्मानचिन्ह जाहीर झाले आहे. या नऊजणांना जाहीर झालेल्या सन्मानचिन्हामुळे मिरा भाईंदर वसई विरार पोलिस आयुक्तालयाचाही गौरव वाढला आहे.

राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी २०२३ या वर्षातील पोलिस महासंचालक सन्मानचिन्ह जाहीर केले आहेत.

## या अधिकाऱ्यांचा गौरव

राज्यातील ८०० अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना हे पदक मिळाले आहे. यामध्ये मिरा भाईंदर - वसई विरार पोलिस आयुक्तालयातील ९ जणांचा समावेश आहे. गुन्हे शाखा युनिट एकचे पोलिस निरीक्षक अविराज कुऱ्हाडे, सायबरची धुरा सांभाळणारे पोलिस निरीक्षक सुजीतकुमार गुंजकर, भरोसा सेलच्या सहायक पोलिस निरीक्षक तेजश्री शिंदे यांना सन्मानचिन्ह मिळाले आहे, तर पोलिस उपनिरीक्षक दत्तात्रेय जाधव, सहायक पोलिस उपनिरीक्षक रामचंद्र पाटील, अशोक ईशी, अजय मांडोळे यांनाही हा सन्मान जाहीर झालेला आहे. पोलिस हवालदार जयप्रकाश जाधव, आनंद मोरे, मुकेश पवार यांनाही पोलिस महासंचालक सन्मानचिन्ह मिळाले आहे.

लोकमत पु. पान क्र. 3



# नोकराने पळवले लाखोंचे दागिने

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** नालासोपारा आचोळे लिंक रोडवरील रश्मी हाईट्समध्ये राहणाऱ्या अंजु सिंग (४६) यांच्या घरी ६ एप्रिलला घरकाम करणाऱ्या नोकराने चोरी केल्याची घटना घडली आहे.

संशयित महिला आरोपी ही अंजु सिंग यांच्या घरी कपडे, भांडी धुण्याचे काम करायची. अंजू यांच्या घरातील कपाटात ठेवलेले ३ लाख ५९ हजार रुपये किमंतीचे चेन, अंगठ्या असे सोन्याचे दागिने त्या घरकाम करणाऱ्या महिलेने चोरून नेले. अंजु यांनी त्या महिलेविरोधात गुरुवारी आचोळे पोलिस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे.

लोकमत पु. पान क्र. 3

# मीरा रोडमधून दुचाकी चोरीला

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा रोडच्या शांतीनगर सेक्टर २ मधील सी २३ मध्ये राहणाऱ्या करण जेठवा (२१) याने त्याच्या मित्राची दुचाकी ही इमारतीसमोरील रस्त्यावर उभी केली होती. तेथून चोरट्याने दुचाकी चोरून नेली. या प्रकरणी जेठवा यांच्या फिर्यादीवरून नयानगर पोलिसांनी २४ एप्रिल रोजी ३० हजार रुपये किमतीची दुचाकी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. पोलिस हवालदार विकास यादव हे तपास करत आहेत.

# गटारात पडल्याने वृद्धाचा मृत्यू

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** गोखिवरे येथील सरिता साडीच्या कंपनीच्या बाजूला राहणाऱ्या नारायण बोंडे (७१) या वृद्धाचा गटारात पडून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. २४ एप्रिलला रात्री साडे नऊ वाजण्याच्या सुमारास दारूच्या नशेत असताना दिवाण मार्केटच्या मागे ड्रीमलेन्ड हॉटेलच्या समोरील गटारात तोल जाऊन पडले. त्यात त्यांचा मृत्यू झाला आहे. माणिकपूर पोलिसांनी गुरुवारी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

CamScanner

लोकमत पु.पा. ३.

# विरारमध्ये घरफोडी

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : विरारच्या डोंगरपाडा येथील नीलप्रकाश बंगल्यात राहणारे सौरभ चौधरी (वय ३५) यांच्या घरी २४ एप्रिलच्या रात्री लाखोंची चोरी झाल्याची घटना घडली आहे. चोरट्यांनी त्यांच्या घराच्या दुसऱ्या मजल्यावरील गॅलरीच्या दरवाजाचे लॉक तोडून घरात प्रवेश केला. बेडरूममध्ये असलेल्या कपाटातील ड्रॉव्हरमधून ७ लाख ५८ हजार ८४८ रुपये किमतीचे ६४६ ग्रॅम सोन्याचे दागिने चोरून नेले आहेत. विरार पोलिसांनी गुरुवारी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

# भाईंदरमध्ये महिलेचा विनयभंग

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : भाईंदर पूर्वेच्या नवघर पोलिस ठाणे हद्दीत राहणाऱ्या एका २३ वर्षीय विवाहितेच्या साडीचा पदर भर बाजारात आरोपीने मागून येऊन ओढला व विनयभंग केला. तसेच तिला शिवीगाळ करत माझ्यासाठी लग्न कर नाहीतर माझ्या सोबतचे फोटो तुझ्या पतीला दाखवीन, तुझ्या तोंडावर अॅसिड फेकीन. तुझा चेहरा खराब करून तुझ्याशी लग्न करेन. तुझ्या घरच्यांना मारेन अशी धमकीही दिली. महिलेने अशा आशयाची फिर्याद नवघर पोलिस ठाण्यात दिल्यावर २४ एप्रिल रोजी पोलिसांनी त्या आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिस उपनिरीक्षक संजय लोखंडे माळी हे तपास करत आहेत.

# भाईंदरमधून दुचाकी चोरीला

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : भाईंदर पश्चिमेच्या बावन जीनालय मंदिराजवळील न्यू मिलन अपार्टमेंट मधील चिराग मणियार यांनी इमारतीजवळ उभी केलेली दुचाकी चोरट्यांनी पळविली आहे. याबाबत भाईंदर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस नाईक शिंदे तपास करत आहेत.

लोकसत्ता पान क्र. 15

# चोरांना घाबरवण्यासाठी मानवी पुतळा

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

वसई : वसई-विरार शहरात मोठ्या प्रमाणावर चोऱ्या होऊ लागल्याने नागरिक भयभीत झाले आहेत. मात्र चोरांना घाबरवण्यासाठी वसईतील वर्तक कुटुंबीयांनी अनोखी शक्कल लढवली आहे. त्यांनी आपल्या बंगल्यात एका माणसाचा पुतळा आणून ठेवला आहे. रात्रीच्या वेळी कुणी माणूसच बंगल्यात असल्याचा भास होतो आणि त्यामुळे चोर बंगल्यात फिरकत नाही.

वसईच्या पश्चिम पट्ट्यांमध्ये अनेक लहान गावे आहेत. निसर्गरम्य आणि तेवढाच शांत परिसर असून गावात बंगले आहेत. रात्रीच्या वेळी परिसर निर्मनुष्य असतो. त्याचा फायदा उठवत भुरटे चोर तसेच दरोडेखोर गावात फिरत असतात. सीसीटीव्ही असले तरी भुरटे चोर चेहरा लपवून बंगल्यात चोरी करण्यासाठी येत असतात. त्यामुळे अशा चोरांपासून बचाव करण्यासाठी वसईच्या वर्तक कुटुंबीयांनी अनोखी शक्कल लढवली आहे. वसईच्या सागरशेत परिसरात कुलदीप वर्तक यांचा दवबिंदू नावाचा टुमदार बंगला आहे. या बंगल्याच्या वरच्या मजल्यावरील दर्शनी भागात त्यांनी पुतळा ठेवला आहे.

म.टा.पु. पान क्र. १

# परदेशी नागरिकांना घरे भाड्याने देणाऱ्या २५ जणांवर कारवाई

म. टा. वृत्तसेवा, वसई

पोलिसांना माहिती न देताच परदेशी नागरिकांना घरे भाड्याने देणाऱ्या २५ घरमालकांवर तुळींज पोलिसांनी कारवाई केली आहे. या सर्व घरमालकांवर गुन्हे दाखल करण्यात आले असून, अटक करण्यात आली आहे.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयात, तुळींज पोलीस ठाण्याच्या हद्दीत प्रगतीनगर व मोरेगाव भागात मोठ्या प्रमाणात परकिय नागरिक हे घरे भाडेतत्त्वावर घेऊन राहत आहेत. विदेशी व्यक्ती अधिनियम १९४६ चे कलम ७ अन्वये कोणत्याही परदेशी नागरिकांना कोणत्याही घरात किंवा हॉटेल व व्यावसायिक तत्त्वावर राहण्यास देणे, याबाबतची माहिती घरमालक, हॉटेलचालक यांनी २४ तासांच्या आत सी फार्म भरून स्थानिक पोलिसांना परकीय नागरीक त्यांच्याकडे राहण्याकरीता आल्याची सूचना देणे बंधनकारक आहे. तसे न केल्यास त्यांच्याविरुद्ध गुन्हा नोंद करण्याची तरतूद आहे. त्या अनुषंगाने मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयाचे पोलिस आयुक्त यांनी कारवाई करण्याचे आदेश दिले होते.

तुळींज परिसरात काही घरमालकांनी अशा परकीय नागरिकांना भाडेतत्त्वावर घरे राहण्यास दिली होती. त्याबाबतची माहिती त्यांनी पोलिसांना दिली नव्हती. त्यामुळे एकूण २५ घरमालकांविरोधात गुन्हे दाखल करून घरमालकांना अटक केली आहे. तसेच नागरिकांनी भाडेकरू ठेवताना त्यांची सर्व माहिती पोलिस ठाण्यात द्यावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

CS CamScanner

लोकसत्ता पान क्र १५

# मांसाहार बंदीबाबतचे आक्षेपार्ह वक्तव्य

## अधिकाऱ्यावर कारवाईचे निर्देश

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** मांसाहर बंदीची मागणी करण्यासाठी गेलेल्या जैन समाजाच्या शिष्टमंडळाबरोबर आक्षेपार्ह भाषा वापरणाऱ्या पालिकेच्या आरोग्य अधिकाऱ्याबर कारवाई करण्याचे निर्देश महाराष्ट्र पशु कल्याण कायदा संनियंत्रण समितीने पालिका आयुक्तांना दिले आहेत.

महावीर जयंतीनिमित्त शहरातील कत्तलखाने तसेच मांस मटण विक्रीचे दुकाने बंद ठेवता येतील असे निर्देश राज्य शासनाने एका परिपत्रकाद्वारे दिले आहेत. त्यामुळे जैन समाजाचे प्रतिनिधी आरोग्य विभागाचे अधिकारी सुखदेव दरवेशी यांना भेटायला गेले होते. या परिपत्रकानुसार शहरातील चिकन मटण विक्रीचे दुकाने बंद ठेवावी, अशी मागणी शिष्टमंडळाने केली. मात्र दरवेशी यांनी यावेळी भावना दुखावणारे वक्तव्य केल्याची तक्रार खोखाणी यांनी केली होती. भाजपने याप्रकरणी दरवेशी यांनी माफी मागावी तसेच त्यांची पालिकेतून हकालपट्टी करावी, अशी मागणी केली होती. मात्र पालिकेने दरवेशी यांच्यावर कुठलीही कारवाई केली नाही. त्यामुळे भाजपचे उपजिल्हाध्यक्ष मनोज बारोट यांनी राज्याच्या महाराष्ट्र पशु कल्याण कायदा संनियंत्रण समितीकडे तक्रार केली.

महाराष्ट्र पशु कल्याण कायदा संनियंत्रण समितीने या प्रकाराची गंभीर दखल घेतली आहे. समितीचे अध्यक्ष अशोक जैन यांनी या प्रकरणी आयुक्त अनिलकुमार पवार यांना लेखी आदेश देऊन चौकशी करून कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.

पालिकेने पत्रक काढून रविवार २१ एप्रिल रोजी चिकन-मटण विक्रीची दुकाने बंद ठेवण्याचे आदेश काढले होते. मात्र विक्रेत्यांनी हे आदेश झुगारून दुकाने सुरूच ठेवली होती. यावर पालिकेने कुठलीही कारवाई केली नव्हती.



# आर्थिक देवाणघेवाणीवर नजर ठेवण्यासाठी भरारी पथक

**लोकसत्ता, विशेष प्रतिनिधी**

**वसई :** लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नालासोपारा विधानसभा मतदारसंघात ९ भरारी पथके आणि १२ स्थिर सर्वेक्षण पथक तयार करण्यात आले आहे. वाहनांची तपासणी करून आर्थिक देवाणघेवाणीवर पथकांमार्फत लक्ष ठेऊन कारवाई केली जाणार आहेत.


पालघर लोकसभा मतदारसंघाची निवडणूक येत्या २० मे रोजी होणार आहे. त्या अनुषंगाने हे पथक ठिकठिकाणी छापे घालून तपासणी करणार आहेत. नालासोपारा, विरार रेल्वे स्थानकात तपासणी पथक नियुक्त करण्यात आले आहेत. निवडणूक काळात मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहार होत असतो. तो रोखण्यासाठी हे पथक काम करणार आहे. प्रामुख्याने वाहनांची तपासणी करणे, संशयास्पद व्यक्तींच्या बॅगा तपासणे, कुठलाही अनुचित प्रकार घडू नये, यावर या पथकांमार्फत लक्ष ठेवले जाणार आहे. गैरप्रकार आढळल्यास तात्काळ कारवाई करण्याचे निर्देश या पथकांना देण्यात आले आहेत. तपासणी पारदर्शक व्हावी यासाठी चित्रिकरण देखील करण्यात येत असल्याची माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी शेखर घाडगे यांनी दिली.

CS CamScanner

पुण्यनगरी पु. पान क्र. १

# वसईत प्रदूषणामुळे होतेय नागरिकांची घुसमट

## मधूबनमधील आठ आरएमसी प्लांटमुळे प्रदूषण



। विजय देसाई

**वसई :** वसई पूर्वेच्या मधुबन परिसरात ८ आरएमसी प्लांट तयार झाले असून त्यामुळे मोठे प्रदूषण होऊ लागले आहे. यामुळे नागरिकांना आता श्वसनाच्या तक्रारीही वाढू लागल्या आहेत. दुसरीकडे महामार्गावरील प्रदूषण करणाऱ्या आरएमसी प्लांटवर अद्याप वसई विरार महापालिकेने कारवाई केलेली नाही. त्यामुळे वसई विरारचे नागरिक आरएमसी प्लांटमुळे निर्माण होणाऱ्या प्रदूषणाच्या विळख्यात सापडले असून त्यांची घुसमट होत आहे.

वसई पूर्वेच्या मधुबन परिसर असून तेथे मोठ्या प्रमाणावर नागरीवस्ती होऊ लागली आहे. हा परिसर शांत आणि मोकळ्या हवेचा परिसर म्हणून ओळखला जात होता. सकाळी आणि संध्याकाळी स्थानिक येथे चालण्यासाठी येत असतात. मात्र आता या मधुबन परिसराला प्रदुषणाचा विळखा बसू लागला आहे. या परिसरात तब्बल ८ आरएससी प्लांट (रेडी मिक्स कॉंक्रीट) उभे राहिले आहेत. या आरएमसी प्लांटमुळे संपूर्ण मधुबन परिसर धुळीने व्यापला आहे.या प्लांटमधून मोठ्या प्रमाणात कचरा निघतो. त्याचे व्यवस्थापन होत नाही. ज्यामुळे कचरा नाल्यांमध्ये टाकला जातो आणि नाले प्रदूषित होत आहेत. वारंवार तक्रारी करूनही या प्रदुषणकारी प्लांटवर कुठलीही कारवाई करण्यात आलेली नाही. ज्यामुळे शहरात जल आणि वायू प्रदूषण वाढले आहे. तसेच नागरिकांना श्वसनाचे विकार होत आहेत असा नागरिकांनी दावा केला आहे.आरएमसी प्लांट उभारण्यासाठी अनेक परवानग्यांची आवश्यकता असते. त्यानुसार प्लांटधारकाने संबंधित महानगरपालिका, प्रदूषण नियंत्रण मंडळ, जल (प्रतिबंधक व नियंत्रण) कायदा १९७४ नुसार परवानगी घेतली आहे का? याची तपासणी होणे अत्यंत आवश्यक आहे. आरएमसी प्रकल्पामधून दिवस रात्र वातावरणात धूर सोडला जात आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांना श्वास घेण्यासही त्रास होत आहे.

> “ मधुबनमधील आरएमसी प्लांटची तपासणी करून पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून ज्या ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्या केल्या जातील. प्लांटमधून खडी, सिमेंट, वाळू आदींचे धुलीकण बाहेर पडत असतील तर त्यासाठी पाणी शिंपडणे किंवा टरपोलिन अथवा प्लास्टिक अंथरणे असे काही उपाय करण्यास प्लांट व्यवस्थापकांना सुचना दिल्या जातील. तसेच इतर सुरक्षेच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे गरजेचे असेल ते करण्याच्या सुचना देखील दिल्या जातील.
>
> **अनिलकुमार पवार, आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका**

लोकमत

# आरोपीला १३ वर्षांनी बेड्या

## तीन गुन्ह्यांत होता फरार : मध्यवर्ती गुन्हे शाखेच्या पोलिसांना यश

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : खून, गँगरेप व जबर मारहाण या वेगवेगळ्या तीन गंभीर गुन्ह्यांत फरार असलेल्या आरोपीला १३ वर्षांनंतर अटक करण्यात मध्यवर्ती गुन्हे शाखेच्या पोलिसांना यश मिळाले आहे. या आरोपीकडून तीन गुन्ह्यांची उकल करून पुढील चौकशीसाठी वालीव पोलिसांच्या ताब्यात दिल्याची माहिती जनसंपर्क अधिकारी प्रवीण बनगोसावी यांनी शुक्रवारी दिली आहे.

२२ नोव्हेंबर २०१२ रोजी धानिव बागच्या गांगडीपाडा येथे आरोपींनी चोर समजून एकाला मारहाण करून ठार मारले. त्याची ओळख पटू नये, यासाठी नग्न अवस्थेत टाकून दिले होते. वालीव पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला होता. या गुन्ह्यातील आरोपी अक्रम खान उर्फ शेख याचा शोध घेऊनही १३ वर्षांपासून सापडत नव्हता.



तीन गंभीर गुन्ह्यांत फरार असलेल्या आरोपीला पकडण्यात मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी यश मिळवले आहे.

दुसऱ्या घटनेत १० सप्टेंबर २०१५ रोजी २० वर्षांच्या तरुणीवर रिक्षाचालक व त्याच्या इतर साथीदारांनी जबरदस्तीने नालासोपारा येथे नेऊन सामूहिक बलात्कार केला होता. तर तिसऱ्या घटनेत ४ ऑगस्ट २०१२ रोजी धानिवबाग येथे एकाने स्वतःच्या घरात आरोपीला न विचारता भाडेकरू ठेवल्याच्या कारणावरून आरोपी व इतर साथीदारांनी जबर मारहाण करून गंभीर दुखापत केली होती.

वरिष्ठ अधिकाऱ्यांनी चौकशीचे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेतील सपोनि दत्तात्रय सरक, पोलिस हवालदार शिवाजी पाटील, गोविंद केंद्रे, अकील सुतार यांनी गुन्ह्याची वालीव पोलिस ठाण्यातून माहिती घेतली. सखोल तपास करून सापळा लावून आरोपी अक्रम खान उर्फ शेख (३६) याला गुरुवारी ताब्यात घेतले.



CamScanner

लोकमत

# आयुक्तालयातील नऊ पोलिसांना सन्मानचिन्ह

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या मिरा भाईंदर वसई, विरार पोलिस आयुक्तालयातील दोन पोलिस निरीक्षक, एक सहायक पोलिस निरीक्षक, तीन सहायक पोलिस उपनिरीक्षक आणि तीन कर्मचाऱ्यांना २०२३ या वर्षाकरिता पोलिस महासंचालक सन्मानचिन्ह जाहीर झाले आहे. या नऊजणांना जाहीर झालेल्या सन्मानचिन्हामुळे मिरा भाईंदर वसई विरार पोलिस आयुक्तालयाचाही गौरव वाढला आहे.

राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी २०२३ या वर्षातील पोलिस महासंचालक सन्मानचिन्ह जाहीर केले आहेत.

## या अधिकाऱ्यांचा गौरव

राज्यातील ८०० अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना हे पदक मिळाले आहे. यामध्ये मिरा भाईंदर - वसई विरार पोलिस आयुक्तालयातील ९ जणांचा समावेश आहे. गुन्हे शाखा युनिट एकचे पोलिस निरीक्षक अविराज कुराडे, सायबरची धुरा सांभाळणारे पोलिस निरीक्षक सुजीतकुमार गुंजकर, भरोसा सेलच्या सहायक पोलिस निरीक्षक तेजश्री शिंदे यांना सन्मानचिन्ह मिळाले आहे, तर पोलिस उपनिरीक्षक दत्तात्रेय जाधव, सहायक पोलिस उपनिरीक्षक रामचंद्र पाटील, अशोक ईशी, अजय मांडोळे यांनाही हा सन्मान जाहीर झालेला आहे. पोलिस हवालदार जयप्रकाश जाधव, आनंद मोरे, मुकेश पवार यांनाही पोलिस महासंचालक सन्मानचिन्ह मिळाले आहे.

Hello Vasai
Page No. 1 Apr 27, 2024
Powered by: erelego.com

CamScanner

दैनिक

एक साथ प्रकाशित, पालघर, ठाणे, मुंबई.

# मुंबई केसरी टाइम्स

www.mumbaikesaritimes.com

वर्ष : १८ अंक : १९ शनिवार २७ अप्रैल २०२४ मूल्य 2 रुपए Post-Reg- No. PLG/95/2020/2022 पृष्ठ : 04

# फरार अपराधी १३ साल बाद मध्यवर्ती अपराध जांच शाखा की गिरफ्त में आया

वसई .हत्या,सामूहिक दुष्कर्म और जबरन मारपीट के तीन अलग-अलग अपराधों में फरार अभियुक्त को मध्यवर्ती अपराध जांच शाखा ने १३ साल बाद गिरफ्तार करने में सफलता हासिल की है। यह कार्रवाई डीसीपी (क्राइम) अविनाश अंबुरे और एसीपी (क्राइम) मदन बल्लाल के मार्गदर्शन में मध्यवर्ती अपराध जांच शाखा के प्रभारी पुलिस निरीक्षक राहुल राख,पी.आई.धनंजय पोरे के नेतृत्व में सपोनि दत्तात्रय सरक,नितीन बेंद्रे व पोउपनि नितीन विचारे की टीम ने की है।पुलिस अधिकारी ने बताया कि,२२ नवंबर २०१२ को धानिवबाग,गांगडीपाडा,रशिद कंम्पाउण्ड, नालासोपारा पूर्व या स्थान पर अभियुक्त द्वारा चोर समझकर एक शख्स की जबरन मारपीट कर उसकी हत्या कर दी गई और पहचान न होने देने के इरादे से नग्न अवस्था में छोड़ दिया,इस संबंध में वालीव थाने में कलम ३०२,२०१,१४३,१४७,१४८,१४९ सह मुंबई पुलिस अधिनियम की धारा ३७(१)(३), १३५ के तहत मामला दर्ज किया गया था।ऐसी क्रम में १० सितंबर २०१५ को एक २० वर्षीय लड़की को रिक्शे में घाटकोपर ले जाया गया और रिक्शा चालक और



उसके साथियों ने उसे जबरन नालासोपारा ले जाकर सामूहिक बलात्कार किया।इस संबंध में निर्मल नगर पुलिस स्टेशन ३७६ (डी), ३६६, ३४१, ५०६, ५०६(२), ३४ के तहत केस दर्ज किया गया था।इसी क्रम में ४ अगस्त २०१२ को धानिवबाग, नालासोपारा पूर्व में शिकायतकर्ता ने अभियुक्त से पूछे बिना अपने ही घर में एक किरायेदार रखा।इसी बात को लेकर अभियुक्त व अन्य साथियों ने शिकायतकर्ता को लोहे की सरिया से जमकर पीटा, जिससे उसका सिर व टखने गंभीर रूप से घायल हो गए। इस मामले में वालीव थाने में ३२६,३२५,४२७,३४ के तहत केस दर्ज किया गया था।पुलिस अधिकारी ने कहा कि,वरिष्ठ अधिकारियों ने गंभीर और संवेदनशील अपराध के आरोपियों की तलाश के आदेश दिए हैं.उपरोक्त तीनों अपराध अत्यंत गंभीर थे तथा उक्त तीनों अपराधों में फरार अभियुक्त अक्रम रियासत अली खान ऊर्फ शेख की पहले बहुत ही सावधानी से तलाश की गई,इसके अलावा वह पिछले १३ वर्षो से उपलब्ध नहीं था।तदनुसार, मध्यवर्ती अपराध जांच शाखा के एपीआई दत्तात्रय सरक,पुलिस कर्मी शिवाजी पाटिल,मोविद केंद्र,अकील सुतार ने वालिव पुलिस स्टेशन से उक्त अपराध के बारे में जानकारी प्राप्त की और अभियुक्त की गहन जांच की।लगातार २ माह तक २४ घंटे कार्य कर तकनीकी विश्लेषण कर अनुसंधान जारी रखते हुए आरोपियों के संबंध में सभी आवश्यक जानकारी प्राप्त कर,जाल बिछाकर अभियुक्त अक्रम रियासत अली खान ऊर्फ शेख ( उम्र ३६ वर्ष - निवासी-रुम नं ७०५ अ विग,ग्रीन हाईट, आचार गल्ली,शिलफाटा,सुंचा,जि.ठाणे,मुल निवासी- ता.रुधौली,जि.बस्ती,राज्य उत्तरप्रदेश ) को हिरासत में लिया गया,जब उपरोक्त अपराध के संबंध में उसकी जांच की गई तो पता चला कि वह उक्त ३ अपराधों में सक्रिय रूप से शामिल था।पुलिस ने कहा कि,आरोपी को आगे की कार्रवाई के लिए वालिच पुलिस स्टेशन को सौंप दिया गया है और उसे गिरफ्तार कर लिया गया है।इस तरह मध्यवर्ती अपराध जांच शाखा ने हत्या,सामूहिक बलात्कार और जबरन हमले के अपराध में पिछले १३ वर्षों से लापता आरोपी को पकड़ने में सफलता हासिल की है।

CS CamScanner